## थोडक्यात...

### शासकीय तंत्रनिकेतन जिंतूर येथे जागतिक नेत्रदान दिन मोठ्या उत्साहात संपन्न; विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



(सचिन रायपत्रीवार/ दै.धर्मयोध्दा)

**जिंतुर** – शासकीय तंत्रनिकेतन जिंतूर येथे जागतिक नेत्रदान दिनानिमित्त एका विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग आणि पालकांनी अतिशय मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. नेत्रदानाचे महत्त्व, त्याचे समाजातील योगदान आणि याविषयी असलेले गैरसमज दूर करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. उपस्थितांच्या भरघोस प्रतिसादामुळे हा सोहळा अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला. सदरील कार्यक्रमांमध्ये प्रभारी प्राचार्य राठोड, कळमकर, नवगजे, यांची उपस्थिती दर्शनीय होती. त्याचबरोबर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती आर के देवशी मॅडम यांनी केले.

### अभिनव वरिष्ठ महाविद्यलाया च्या विद्यार्थ्याची भारतीय सैन्य दलात अग्नीवर म्हणून निवड



**जिंतूर** – अभिनव वरिष्ठ महाविद्यलाय जिंतूर येथे बी. ए. ट्रॅव्हल अँड टुरिझम तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या मंगेश अर्जुन हागे या विद्यार्थ्याची भारतीय सैन्य दलात अग्नीवर म्हणून निवड झाल्या बद्दल महाविद्यलयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी प्राचार्य डॉ विजयकुमार ह. पव्हणे , प्रा. बुधवंत गजानन , श्री अथर्व जायफळे , श्री अरविंद जाधव उपस्थित होते.

### नांदेड विभागात विशेष तिकीट तपासणी मोहीम; १,१५५ प्रकरणे दाखल, ५.८६ लाख महसूल वसूल

(शेख असद /दै.धर्मयोध्दा)

**पूर्णा**– दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागाने प्रवाशांना सुरक्षित, नियमबद्ध आणि सुलभ प्रवासाची अनुभूती देण्यासाठी ९ जून २०२६ रोजी विभागातील विविध रेल्वे स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये व्यापक विशेष तिकीट तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत अनधिकृत प्रवासाच्या १,१५५ प्रकरणांमध्ये कारवाई करत रेल्वेने ५,८६,४५५ इतका महसूल वसूल केला आहे.

मोहिमेदरम्यान तिकीट तपासणी पथकांनी गाड्या, स्थानके आणि महत्त्वाच्या प्रवासी क्षेत्रांत सखोल तपासणी केली. यात विनातिकीट प्रवास करणाऱ्या ८०४ प्रवाशांवर कारवाई करून ४,४७,०१० महसूल जमा झाला. अनियमित प्रवास करणाऱ्या २४५ प्रवाशांच्या प्रकरणांमधून १,२२,५५० तर बुक न केलेल्या सामानाच्या १०६ प्रकरणांमधून १६,८९५ इतकी रक्कम वसूल करण्यात आली.

या मोहिमेसाठी एकूण १५४ तिकीट तपासणी कर्मचारी तैनात करण्यात आले होते. यामध्ये २९ कर्मचारी तिकीट तपासणी पथकांमध्ये, १२ कर्मचारी स्थानकांवर स्थिर तपासणीसाठी आणि ११३ कर्मचारी सुविधा व स्लीपर श्रेणी तपासणीसाठी कार्यरत होते. नांदेड विभागाचे मुख्य उद्देश महसूल गळती रोखणे, रेल्वे नियमांचे काटेकोर पालन करणे आणि वैध तिकीटधारक प्रवाशांना आरामदायी प्रवास उपलब्ध करून देणे हा आहे. अशा मोहिमांमुळे आरक्षित डब्यांतील अनावश्यक गर्दी कमी होण्यास मदत होते.

विभागाने सर्व प्रवाशांना आवाहन केले आहे की, प्रवासापूर्वी वैध तिकीट खरेदी करावे, अधिकृत श्रेणीत प्रवास करावा आणि सामानाचे योग्य बुकिंग करावे. भविष्यातही अशा तिकीट तपासणी मोहिमा नियमितपणे राबवल्या जाणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची खासदार रामराव वडकुते यांनी घेतली सदिच्छा भेट;महाराष्ट्राच्या विकासावर सकारात्मक चर्चा




(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली** - नुकतेच राज्यसभा सदस्यपदी बिनविरोध निवडून आलेले भाजपाचे खासदार रामराव वडकुते यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवनात भारताच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची सहपरिवार सदिच्छा भेट घेतली. या शिष्टाचार भेटीदरम्यान खासदार रामराव वडकुते यांच्यासोबत त्यांच्या पत्नी इंदुताई रामराव वडकुते, शशिकांत वडकुते आणि दिलीप वडकुते उपस्थित होते.

या भेटीदरम्यान खासदार वडकुते यांनी महामहिम राष्ट्रपतींशी सविस्तर संवाद साधला. या प्रसंगी प्रामुख्याने मराठवाडा परिसर तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार रामराव वडकुते म्हणाले की,विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत घडवण्यासाठीच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये आदरणीय राष्ट्रपतींचे मोलाचे मार्गदर्शन, अफाट ज्ञान आणि दूरदृष्टी आम्हांला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व शुभेच्छांबद्दल मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांच्या प्रेरणेतून जनकल्याण, विकास आणि राष्ट्रनिर्माणासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर खासदार रामराव वडकुते यांनी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही सहकुटुंब सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी विविध राजकीय व सामाजिक विषयांवर चर्चा झाली.

## हिंगोलीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करा; आ.मुटकूळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली** - जिल्ह्याचा शैक्षणिक विकास वेगाने व्हावा आणि स्थानिक विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षण मिळावे, यासाठी हिंगोलीत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करावे, अशी मागणी आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. हिंगोली जिल्ह्यातील आणि परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड बुद्धिमत्ता व गुणवत्ता आहे. मात्र, स्थानिक पातळीवर उच्च व तंत्रशिक्षणाच्या पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत.परिणामी, येथील गरीब, शेतकरी, कष्टकरी व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे आणि मुंबई यांसारख्या दूरच्या व मोठ्या शहरांमध्ये जावे लागते. मोठ्या शहरांमधील महागडे शिक्षण आणि राहण्याचा मोठा खर्च सामान्य पालकांच्या आवाक्याबाहेर आहे. आर्थिक परिस्थिती अभावी अनेक हुशार व होतकरू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत. हिंगोली येथे हक्काचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाल्यास, या भागातील हजारो विद्यार्थ्यांना त्याचा थेट लाभ मिळेल. विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणावर कमी होईल. स्थानिक पातळीवरच दर्जेदार व नामांकित तांत्रिक शिक्षण मिळाल्यामुळे या संपूर्ण परिसराच्या शैक्षणिक, औद्योगिक आणि आर्थिक विकासाला एक नवी दिशा व गती मिळेल जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य आणि या मागास भागाचा सर्वांगीण विकास विचारात घेता,हिंगोली येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास मंजुरी द्यावी,अशी मागणी आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांनी केली असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या मागणीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे.

## पू.सानेगुरुजी यांच्या पूण्यतिथी निमित्त संस्कार प्रबोधिनी संस्थेच्या वतीने अभिवादन



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**बीड**- बीड च्या संस्कार प्रबोधिनी संस्थेचे प्रेरणास्थान प.पू.सानेगुरुजी (पांडुरंग सदाशिव साने) यांच्या पूण्यतिथी निमित्त दिनांक ११ जून २०२६ रोजी संस्कार विद्यालय बीड येथे संस्थेच्या वतीने त्यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या पूण्यस्मृतीस अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास संस्कार प्रबोधिनी संस्थेचे संचालक श्री सुनील क्षीरसागर, संचालक श्री दिलीप खिस्ती, मुख्याध्यापक श्री दीपक सरदे, मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी, इंग्रजी माध्ममाचे मुख्याध्यापक श्री राम परजने,आणि प्रमुख वक्ते म्हणून संदीप जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पू. सानेगुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिक्षकांच्या वतीने संदीप जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर संचालक श्री दिलीप खिस्ती यांनी पू. सानेगुरुजी यांचे शैक्षणिक विचार आणि त्यांचे साहित्य याबाबत सविस्तर विवेचन केले. कार्यक्रमास सर्व विभागांचे विभागप्रमुख,आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील सोनवळकर यांनी केले.शेवटी मुख्याध्यापक श्री दीपक सरदे यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## वादळ वाऱ्याने सोलरचे नुकसान



**परभणी** – कारेगाव ६ जून २०२६ रोजी झालेल्या वादळी वाऱ्याने परिसरात अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून कारेगाव शिवारातील गट नंबर २३५ मधील शेतकरी ज्योती छत्रगुण वावरे यांच्या शेतातील सोलार चे पूर्णतः नुकसान झाले आहे या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे शेतकरी विजेच्या लपंडावापासून बचाव करण्यासाठी सोलर पंपाचा वापर करत आहे परंतु सततच्या वारे वादळ आणि नैसर्गिक आपत्तीने या सोलर चे नुकसान सातत्याने होत असून सहा जून रोजी झालेल्या वादळी पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

## मेंढपाळांच्या जीवनात स्थिरता मिळावी यासाठी शासन ऊपाय योजना करणार–मंत्री पंकजा मुंडे



(मधुसूदन सोनवळकर /दै.धर्मयोध्दा)

**बीड** - भटकंती करणाऱ्या मेंढपाळ बांधवाच्या जीवनात स्थिरता मिळावी यासाठी मंत्रालयात पंकजाताई मुंडे यांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे ऊपस्थितीत या बैठकीत मेंढपाळ करणारांची कायम स्वरूपी ऊपाय योजना करण्याचे निर्देश बैठकीत पर्यावरण व पशूसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी खात्याचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांना दिले आहेत या वेळी अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शितल कुमार मुकणे ऊपस्थीत होते तसेच अमरावती मेंढपाळ धनगर विकास मंचचे अध्यक्ष संतोष महात्मे यांनी मेंढपाळांच्या समस्या वर तातडीने मार्ग काढण्याची विनंती केली

## गृहीनिचे मासिक ऊत्पन्न प्रति माह ३० हजार रुपये गृहीत धरा–सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासीक निर्णय

(मधुसूदन सोनवळकर/दै.धर्मयोध्दा)



**बीड** - नुकताच सर्वोच्च न्यायालयाने एक महत्व पूर्ण निर्णय दिला आहे घरकाम करणारी गृहीणी यांचे मासिक ऊत्पन्न हे ३० हजार रुपये ग्राह्य धरण्यात यावे. रस्ते अपघातात एखाद्या गृहीनीचा मृत्यू झाल्यास त्यांच्या मृत वारसांना प्रतिमाह ३० हजार ऊत्पन्न ग्राह्य धरुन नुकसान भरपाई दिली जावी . सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री संजय करोल आणि न्याय मुर्ती श्री एन . कोटीश्वर सिंग यांच्या खंडपीठाने हा ऐतीहासीक निर्णय दिला आहे. आज पर्यंत अशा प्रकारे रस्ते अपघातात मृत पावलेल्या गृहीनींची तुलना कुशल कामगारांशी करून नुकसान भरपाई दिली जात होती हा निर्णय केवळ विम्याची रक्कम मिळण्या पुरताच मर्यादीत नसून देशातील कोट्यावधी गृहीनिच्या कष्टाला मानाचे स्थान देणारा निर्णय ठरला आहे हा निर्णय २३ वर्षा पुर्वी पंजाब राज्यात झालेल्या रस्ते अपघात प्रकरणी दाखल याचिकेच्या सुनावनी दरम्यान दिला आहे खंड पीठाने न्याय निवाडा करतांना रस्ते अपघात झाल्या पासून एक वर्षाच्या आत असे प्रकरण निकाली निघेल या साठी नविन नियमावली तयार करण्याच्या सुचना ही सरकारी पक्षाला केली आहे

## सामूहिक खरेदीचा लाभ; लोणी बु येथील जागरूक महिला सखी गटाला ७,५०० रुपयांची बचत

### पाथरीतील पवन सीड्स अँड फर्टिलायझरचा 'फार्मर कप २०२६' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)




**पाथरी** - शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेले बियाणे, खते व कीटकनाशकांची खरेदी परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हावी आणि सामूहिक खरेदीद्वारे आर्थिक बचत व्हावी या उद्देशाने पाथरी येथील पवन सीड्स अँड फर्टिलायझर यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'फार्मर कप २०२६' या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.तालुक्यातील लोणी (बु.) येथील जागरूक महिला सखी गटाने एकत्रितपणे बियाणे, खते व कृषी औषधांची खरेदी पवन सीड्स अँड फर्टिलायझर, पाथरी येथून केली. सामूहिक खरेदीमुळे गटातील सदस्यांना तब्बल ७,५०० रुपयांची बचत झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी गटातील महिलांनी सांगितले की, शेतीसाठी लागणारे दर्जेदार बियाणे, खते व औषधे एकाच ठिकाणी योग्य दरात उपलब्ध झाल्याने खर्चात बचत झाली. तसेच सामूहिक खरेदी केल्यामुळे विविध सवलतींचा लाभ मिळाला. यामुळे शेतीचा उत्पादन खर्च कमी करण्यास मदत झाली असून भविष्यातही अशाच प्रकारे एकत्रित खरेदी करण्याचा निर्धार महिलांनी व्यक्त केला. या उपक्रमात सरस्वती मांयदळे, मंगल फुके, किंसंविदा फुके, सागर गिराम, कुशावर्ता मांयदळे, शिवकन्या फुके, सुनिता धर्मे, शकुंतला मांयदळे यांच्यासह महिला सखी गटातील सदस्य सहभागी झाले होते. कृषी सहाय्यक लहाने सर यांनी शेतकऱ्यांनी सामूहिक खरेदीचा अवलंब केल्यास उत्पादन खर्चात बचत होऊन आर्थिक फायदा मिळू शकतो, असे सांगितले. त्यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार कृषी निविष्ठांचा वापर करून अधिक उत्पादन घेण्याचे आवाहन केले. 'फार्मर कप २०२६' या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिला शेतकरी व बचत गटांमध्ये सामूहिक खरेदीबाबत जागरूकता वाढत असून, खर्चात बचत करून शेती अधिक फायदेशीर करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरत असल्याची भावना सहभागी महिलांनी व्यक्त केली.

## बोरी येथे सोयाबीन पिक प्रात्यक्षिक व बियाणे वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न;शेतकरी महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग



(संतोष तायडे/ दै.धर्मयोध्दा)

**बोरी**- जिंतूर तालुक्यातील बोरी येथे मल्हारी महिला बचत गट व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोयाबीन पिक प्रात्यक्षिक व बियाणे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात महिलांना आधुनिक शेती पद्धती, सोयाबीन लागवडीचे महत्त्व व बियाण्यांचे योग्य व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मल्हारी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ. प्रतिभा तायडे या होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. आशाताई गायकवाड व सौ. शारदा तायडे उपस्थित होत्या. यावेळी प्रमुख पाहुण्या सौ. आशाताई गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, महिलांच्या चिकाटीपणा व व्यवहारिक दृष्टिकोनामुळे कुटुंबाचा आर्थिक व सामाजिक कायापालट होऊ शकतो. महिलांनी स्वतः बाजारात जाऊन सोयाबीनसह इतर पिकांच्या बाजारभावाची माहिती घ्यावी तसेच शेती उत्पन्नाचे योग्य नियोजन करून कुटुंब सुखी व समृद्ध करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास उत्तमराव तात्या शिंपले, शिवाजी चौधरी, विष्णू तायडे, तुकाराम गोरे, तुकाराम सर्जे, विश्वनाथ शिंपले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच प्रसाद गोरे, विकास काळे, वेदांत तायडे, गंगाधर शिंपले यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी लाभार्थींना सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao